

# कन्या व कुमार घोसरवाड शाळेत सायबर सिक्युरिटी सेमिनार संपन्न

**घोसरवाड : प्रतिनिधी-**

रोटरी विझडम पुणे व क्विकहिल फौंडिशन यांचे वतीने सायबर सिक्युरिटी बाबत मार्गदर्शन कन्या व कुमार विद्या मंदिर घोसरवाड येथे संपन्न झाले. दोन्ही शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थी -विद्यार्थिनी सहभागी झाले होते. फॉरेन्सिक लॉचे दिनेश सुभेदार यांनी सायबर गुन्हे, खबरदारी, उपाय, इंटरनेट वापरताना काळजी कशी घ्यावी ? सायबर गुन्ह्यावर प्रतिबंध व सोशल मिडियाचा जबाबदरीने वापर यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी रोटरी विझडम पुणेचे अध्यक्ष सारंग बालंके, कुलकर्णी, मुख्याध्यापक रमेश कोळी, मुख्याध्यापक दत्तात्रय कमते, रमेश कोळी, हिंदूराव फास्के, गुंडा परीट, ज्योती परीट, बाळासाहेब कांबळे, नंदकुमार पोवार, दशरथ खोत, अनिल मंगावे यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.